MHNS290009552023

हिराबाई बबन राव
वि.
सोनाली पैठणकर व इतर

**विशेष दिवाणी दावा क्र.२२२/२०२३**

**आदेश निशाणी क्र.२३ वर**

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे नो—डब्ल्यु एस आदेश सेट असाईड होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जाला प्रतिवादी यांनी हरकत घेवून असे नमूद केले आहे की, वादीने सदरचा दावा दाखल केलेला असून वादीच सदरच्या दाव्यात मुद्दाहून विलंब करीत असल्याने, वादीला जबाब दाखल करणे कामी जवळ जवळ १८० दिवसांचा विलंब झालेला आहे. त्यामुळे वादी विरूध्द जास्तीत जास्त कॉस्ट करण्याचा आदेश होण्याची विनंती केली आहे.

३. अर्ज व म्हणणे वाचले.

४. अभिलेखावरून असे दिसते की, प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींविरूध्द डिक्लरेशन, निरंतरची ताकीद व इतर दादी मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदरच्या दाव्यात प्रतिवादी यांनी निशाणी १७ सोबत दाखल केलेल्या कॉउटर दाव्यास जबाब देणेकामी नमूद केले आहे. वादी यांचे दरम्यानच्या काळात डोळयाचे ऑपरेशन झाल्यामुळे जबाब मुदतीत दाखल करता आला नसल्याचे कथन प्रस्तुत अर्जात वादीने केले आहे. परंतु न्यायालयाने दि.०८.१२.२०२२ रोजी वादीविरूध्द नो—डब्ल्यु एस आदेश पारित केला आहे. प्रस्तूत अर्जातील कारणांचा विचार करता तसेच प्रकरण गुणवत्तेवर सुनावणी करण्यासाठी वादी यांना योग्य त्या खर्चाची रक्कम लावून परवानगी दिल्यास प्रतिवादींचे काही नूकसान होणार नाही असे दिसते. सबब, मी

पुढील आदेश पारित करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

निशाणी २३ वरील अर्ज रू.२००/— (अक्षरी रूपये दोनशे मात्र) तालुका विधी सेवा समिती, इगतपुरी येथे भरण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

MADHAV SANGAPPA BORALE

Digitally signed by MADHAV SANGAPPA BORALE
Date: 2023.08.02 15:47:26 +0530

( माधव एस. बोराळे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इगतपुरी जि.नाशिक.

दि.०१.०८.२०२३.

(J.O. Code :- MH02022)

Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app “**eCourts Services**” from Android or iOS